पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.
मा. शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ९**
सभावृत्तात

दिनांक :- ०७ / ०९ / २०१२ वेळ :- दुपारी ०४.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची (विशेष) सभा शुक्रवार दिनांक ०७ / ०९ / २०१२ रोजी दुपारी ४.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. बो-हाडे शुभांगी संजय - सभापती
२) मा. काळजे नितीन प्रताप
३) मा. यमुनाताई रमणनाना पवार
४) मा. प्रशांत शितोळे
५) मा. बहिरवाडे नारायण सदाशिव
६) मा. लोंढे गणेश नारायण
७) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
८) मा. सावळे सिमा रविंद्र

याशिवाय मा.परदेशी - आयुक्त, मा.गावडे - सहा.आयुक्त, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा. चाकणकर - प्र. नगरसचिव, मा.काची - सह शहर अभियंता, मा.भदाणे - उपसंचालक नगररचना, मा.पाटील, मा.तांबे, मा.ढगे - कार्यकारी अभियंता, मा.शिंपी - नगररचनाकार, मा.लावंड - कायदा अधिकारी, मा.बाबा बागल - प्रशासन अधिकारी, मा.देशमुख - कायदा सल्लागार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक :- ५१ विषय क्रमांक : १
दिनांक :- ०७/०९/२०१२
सुचक :- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक :- मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ :- मा.प्रशांत शितोळे, मा.नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव -

मौजे वडमुखवाडी येथील गट नं.१५४ व १५५ चे उत्तर हद्दीवर मंजूर विकास योजनेत १८ मी. रस्ता प्रस्तावित आहे. सदर पुर्व पश्चिम रस्ता पुढे गावाचे हद्दीवरील रस्त्यापर्यंत सलग जोडणे आवश्यक आहे. कारण या भागातील ब-याचशा नागरीकांना कोणताही पर्यायी रस्ता नाही. त्याकरीता गट नं.१७७ ते १८२ मधुन सलग असा पुर्व पश्चिम १८ मीटर रस्ता मुंबई प्रांतिक मनपा

अधिनियम १९४९ चे कलम २०५ नुसार नगररचना व विकास विभागाने कार्यवाही करुन घोषित करणेस व रस्ता आखणीला शासनाची मान्यता घेणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ५२ विषय क्रमांक : २
दिनांक :- ०७/०९/२०१२
सुचक :- मा.सुरेश म्हेत्रे अनुमोदक :- मा. प्रशांत शितोळे
संदर्भ :- मा.सुरेश म्हत्रे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या भागशः मंजूर विकास योजनेतील मौजे चिखली येथील साने चौक ते तळवडे हद्दी (शीव) पर्यंतचा मंजूर २४.०० मीटर रूंद रस्ता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये १८.०० मी. रुंद करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ५३ विषय क्रमांक : ३
दिनांक :- ०७/०९/२०१२
सुचक :- मा.सुरेश म्हेत्रे अनुमोदक :- मा. नितीन काळजे
संदर्भ :- मा.सुरेश म्हत्रे, मा. नितीन काळजे यांचा प्रस्ताव.

निगडी येथे से.नं.२२ येथील वॉर्ड क्रमांक ११, १२, १३ चा समावेश होतो. या भागात पुनर्वसन अंतर्गत नविन इमारतीचे काम कोर्टाचे आदेशामुळे बंद ठेवले आहे. परंतु २५६ गाळे ५७६ गाळे राजनगर, राहुलनगर, मिलिंदनगर, ओटा स्किम या भागात बहुतांश नागरिक राहत असून या ठिकाणी नागरी सुविधा, रस्ते, गटर, स्वच्छतागृह इत्यादी सुविधा चालु ठेवणे व त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच या भागात असणारे मनपाचे हॉस्पिटल, शाळा, समाजमंदिर इ. ठिकाणी आवश्यक कामे चालू ठेवणे आवश्यक आहे. तरी या भागात पूर्वी प्रमाणेच मनपाने सुविधा चालू ठेवण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ५४ विषय क्रमांक : ४

दिनांक :- ०७/०९/२०१२

सुचक :- मा.यमुनाताई पवार अनुमोदक :- मा. सुरेश म्हत्रे

संदर्भ :- मा. यमुनाताई पवार, मा.सुरेश म्हत्रे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून ज्याप्रमाणे इतर ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसवतो व अंतर्गत रस्त्यांचे सुशोभिकरण करतो. खाजगी सोसायटयांमध्ये घरपट्टी व इतर कर भरणारे नागरीक वास्तव्य करतात. त्यांच्या सुखसोयीकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून खाजगी सोसायट्यांमध्ये पेव्हींग ब्लॉक व इतर सुविधा देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**( बो-हाडे शुभांगी संजय )**
सभापती
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी १८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस / ४ / कावि / ११६४ / २०१२
दिनांक :- ०७ / ०९ / २०१२

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत :- सर्व संबंधीत शाखा प्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.